# प्रकरण ५

# गणेश चौधरी यांचे अल्पचरित्र

## “गणेश चौधरी यांचे अल्पचरित्र”

माणसाला आपले दु:ख, आनंद केव्हातरी का होईना, कुणाला ना कुणालातरी सांगावेसे वाटते. अंतर्मनात मनाच्या गाभाऱ्यात कुठल्या तरी कप्प्यात खदखदत असणारे, उन्मळून, उचळून येणारे बाहेर पाडण्यास आतूर असलेले, सांगितले पाहिजे असे वाटते म्हणजेच भोगताना, सोसताना जो मानसिक, भावनिक, वैचारिक आणि शारिरीक ताण त्याच्यावर पडलेला असतो. तो हलका करण्यासाठी गणेश चौधरी यांनी साहित्यलेखन केले. आणि आपले मन आणि भावना मोकळेपणाने त्यांनी साहित्यातून मांडले. ते त्यांच्या अनेक साहित्यकृतीवरुन दिसून येते. त्याचे अल्पचरित्र पुढील प्रमाणे मांडले आहे.

## गणेश चौधरी यांचे अल्पचरित्र :-

गणेश चौधरी यांच्या अल्पचरित्राचा अभ्यास करताना त्यांनी लेखन केलेल्या ‘नागवा’, ‘तृषार्त’ व ‘काचेचं मन’ आणि दिवाकर चौधरी यांचे ‘स्किझोफेनिया’ या साहित्यकृतीचा अभ्यास केलेला आहे. त्यांचे दाहक जीवन त्यांनी आपल्या साहित्यातून प्रकट केले आहे. आणि त्यांच्या हातून झालेल्या कृत्याचे प्रायश्चित्य म्हणून लेखन केले आहे.

## गणेश चौधरींचा जन्म आणि बालपण :-

गणेश चौधरी यांचा जन्म जळगांव जिल्ह्यातील डांभूर्णी या ग्रामीण भागात झाला आहे. त्यांचे वडील वकिली व्यवसाय करीत होते. त्याचप्रमाणे त्यांची आई ही गृहिणी होती. त्यांना एकून तीन मुले होती. त्यामध्ये मुलगी सर्वात मोठी होती आणि त्यानंतर गणेश आणि दिवाकर अशा पद्धतीने त्यांचे खेडेगांवातील एक छोटेस कुटुंब होते.

गणेश चौधरींच्या बालपणाचा विचार करत असताना त्यांचे बालपण अत्यंत श्रीमंतीत गेले आहे. म्हणजेच ‘नागवा’ या आत्मकथनामध्ये ते लहानपणाची आठवण सांगताना म्हणतात की, “क्लबात जाण्यापूर्वी रामा रोज माझं ओल्या टॉवेलनं तोंड पुसायचा केसांना तेल अन् पाणी लावायचा आणि मग आक्का,ताई, रामा तिघेजण माझा भांग पाडण्यासाठी अक्षरक्ष: राबायचे! अन् माझ्या ‘घोड्यासारखे केस’ (हा आक्काचा शब्द)

त्यांना जाम थकवायचे! तोंडावर पावडर थापायचे कडक इस्त्रीच्या हाप पँटमध्ये कडक शर्ट 'इन' केलेला! अन गुटगुटीत शरीराचा मी! मोठ्या रुबाबात रामबरोबर रोज क्लबात जाई !''[१]

यावरुन गणेश चौधरी यांचे बालपण हे अत्यंत श्रीमंतीत गेले होते. त्यांच्या घरी नोकर, चाकर होते. त्यांचप्रमाणे त्यांच्या वडीलांच्या प्रतिष्ठेचा प्रभाव ही त्यांच्यावर झालेला होता. कारण त्याचे गावातील स्थान आणि आदर यावरुन ते लक्षात येते. गणेश चौधरी यांना सर्वात जास्त प्रेम त्यांच्या ताईने दिले होते. कारण आई शेती बघत असल्यामुळे ताई गणेश चौधरींना काय हव नको ते पाहत असते. आईच्या ठिकाणी प्रेम देण्याचे काम त्यांच्या बहिनीने केलेले आहे. एका चांदण्यारात्री ताई परिक्षेची तयारी करत होती. मी तिच्या शेजारी झोपलो होतो. तेव्हा ताई कविता पाठांतर करत होती. मला आईच्या आठवणीने डोळे भरुन आले तेव्हा ताई म्हणते की, ''आणि ताई, गदगदलेल्या सूरात विचारते, 'तु रडतोय दादा?'

अन् गळ्यात रुतलेला हुंदका मोकळा होते. तशी ती उठते माझे डोके मांडीवर घेऊन थोपटू लागते..... आई होऊन समज घालू लागते....... त्या चांदण्या रात्रीवर साथ धरु लागते....

तेव्हा कळलं नव्हतं पण आज कळतयं हुंदका फुटण्याआधी तिला कसं कळलं ते।''[२]

त्याचप्रमाणे आईच्या आणि वडीलांच्या प्रेमासाठी तडफणारा गणेश कुठेतरी ताईमध्ये आईच्या प्रेमाचा ओलावा शोधत होता. त्याला बालपणी इतर मुलांच्याप्रमाणे मनमोकळेपणाने खेळता ही आलेल नाही. बाबांच्या प्रतिष्ठेला धक्का लागू नये म्हणून आपण असे वागणे बरोबर नाही याचे पालूपद यामुळे त्यांच्या मनावर झालेला आघात दिसून येतो. ते 'काचेचं मन' यामध्ये लिहितात की, ''बाबांच्या प्रतिष्ठेमुळे सर्वांचे माझ्याकडे फाजील लक्ष होते. खेळांचे वेळी आणि दंगामस्ती केली की, 'तुला शोभत नाही' हे एक पालुपद झाले होते. त्यामूळे वागण्यातील नैसगिकपणा जाऊन अकारण कृत्रिमता निर्माण झाली होती किंवा हे बाबांना कळलं तर त्यांना दु:ख होईल. अशी उगाच, अकारण,

अपराधीपणाची भावना निर्माण झाली होती.... सभ्यता! कृत्रिमतेचं दुसर नांव सभ्यता!... मी उगाच दबला जात होतो."[३]

गणेश चौधरी यांच्या मनावर लहानपणापासूनचं आघात होत होते. त्यांच्या भावना दबल्या जात होत्या. त्याचप्रमाणे बालपणी साधू महाराजानी त्यांचा हात पाहून केलेले भविष्य त्यांना आठवत होते. त्याचप्रमाणे ताई गेल्यामुळे त्यांच्या बालमनावर आघात झाला. त्यावेळी ते सांगतात की, "मृत्युविषयी प्रथमच विचार करायला भाग पाडणारा तिचा मृत्यु मायेसाठी कुठणाऱ्या मनात भयानक पोकळी निर्माण करणारा तिचा अपमृत्यु, जीवनाची गोडी नासणारा तिचा मृत्यु! पमी गेली तेव्हा मरणाविषयी काहीच कळत नव्हत! अन् ताई गेली तेव्हा मृत्युची अपरिहार्यता, अटळता कळण्याइतक मन परिपक्व नव्हत. आज तरी कुठे धड कळतयं? आश्चर्य, अतीव दुःख, भिती होतं ते शोकमग्न."[४]

यावरुन बहिणीवरील प्रेम दिसून येते. त्यांच्यावर आणखी एक गोष्टीचा परिणाम झाला तो म्हणजे वडिलांचे आजारपण, सतत आजारी असलेले वडील आणि त्या आजारपणामुळे वाढणार चिडचिडेपणा त्याचा दुशपरिणाम झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे शाळेत सुधा इतर मुलांनी दंगा, मस्ती केली तरी चालेल पण गणेश चौधरी करत नसत. कारण आदर्श, सभ्यपणा याची मुळे त्यांच्या मनावर बिंबलेली दिसतात. त्याचबरोबर गणेश चौधरींनी लहाणपणी हट्ट ही केलेला दिसून येतो. आईला भेटण्यासाठी, आईला आपल्याजवळ का राहत नाही हा प्रश्न सतत ताईला विचारत असत. गणेश चौधरींना शाळेसाठी गावी राहण्याची, गावातील शाळेत शिकण्याची इच्छा असून ही त्यांना वडिलांच्या प्रतिष्ठेसाठी त्यांना तालुक्याला शाळेत घातले जाते. त्यांना सुट्टीत गावी आल्यावर शाळेसाठी शहरात जायला नकोसे वाटे. येथे त्यांचे बालमन दिसून येते. बालपणीच त्यांना आपल्या आवडी-निवडी यांना मुराडा घालून जीवन जगण्याची सवय झालेली होती. याचा प्रत्यय येथे येतो.

## शिक्षण व नोकरी (सेवा) :-

गणेश चौधरींचे संपूर्ण शिक्षण शहरात झाले होते. पण त्यांना गांवच्या शाळेचे आकर्षन असलेले दिसून येते. पण पुरेसा शिक्षण प्रसार गावाकडील शाळेत झालेला

नव्हता. फक्त या शाळेचा केंद्रबिंदू विद्यार्थी असलेला दिसून येतो. गणेश चौधरी यांच्या शाळेत सुतकताईचे बेसीक शिक्षण सुरु झाले होते याविषयी ते सांगतात की, "आम्हा पोरासोरांना हा तास चांगला वाटायचा. गंमत यायची उदाहरणं, गणित, इतिहास, भूगोल, शहरांची नांव, गांव-छड्या-अशा रितीन हातावर वांरवार छड्या बसण्याऐवजी हातात 'टकळी' आली. आमची तोंडाचीही टकळी सुरुच असे ती शब्दानं सूत कातीत असे."[५] म्हणजेच नवीन शिक्षणाविषयी त्यांना आवड आहे. पण याची शिक्षकांना नुसती ब्याद वाटे. पण अधिकाऱ्यापुढे त्यांची बोलती बंद होई. गणेश चौधरी इयत्ता पाचवीच्या वर्गातील अनुभव येथे सांगतात.

गणेश चौधरी यांनी बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर त्यांनी बी. एड्. साठी प्रवेश सन १९६२-६३ साली घेतला त्यावेळीची आठवण त्यांचे मित्र श्री. मधुकर ब. सरनाईक हे सांगतात की, "गणेश माझा केवळ वर्गमित्रच नव्हता तर जवळचा मित्र होता. कॉलेजचे कार्यक्रम तर त्याने आणि मी मिळूनच गाजविले होते. मी लावण्या म्हणायचो त्याला त्या अतिशय आवडायच्या त्याच्या 'मेघदूता'ने सारे कॉलेज डोक्यावर घेतले होत. अत्यंत हळव्या मनाचा आणि कविहृदयाचा गणेश घरच्या आठवणींनी त्यावेळी अगदी व्याकूळ व्हायचा. आपले पुस्तक वाचले आणि तो गणेश जसाच्या तसा नजरेसमोर उभा राहिला."[६] यावरुन सरदेसाई यांनी 'स्क्रिझोफ्रेनिया' या पुस्तकाबद्दल आपले मत व्यक्त करतात. त्याचप्रमाणे अनेकांनी आपली मते दिलेली आहेत. म्हणजे गणेश चौधरी यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक गुणविशेष आपल्याला दिसतात. एक रसिक आणि कवी मनाचे गणेश चौधरी यातून दिसून येतात.

गणेश चौधरी यांनी शिक्षण घेऊन आपल्या गावच्या कल्याणासाठी आपले आयुष्य घालविले आहे. गावातील मुलांच्यासाठी आपण शाळा बांधली. ती ही गावकऱ्यांच्या आणि स्व कष्टातून. तसेच डांभूर्णी या जळगाव जिल्ह्यातील गावचे लोकप्रिय, विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून प्रसिद्ध होते. एक चांगला शिक्षक म्हणून लौकिक मिळावा ऐवढेच त्यांचे स्वप्न होते. गणित या विषयामध्ये त्यांचा कोणी हात धरु शकत नाही. त्यांनी अनेक कार्यक्रम शाळेत राबवले होते. गॅदरिंग तर त्याच्या काळामध्ये गाजत होते. त्यांना घर

आणि शाळा ही त्यांची दोन पवित्र ठिकाण होती आणि ते शाळेसाठी सदैव कार्यरथ राहत असत. त्यामुळे त्यांना विद्यार्थ्यांनी एक पदवी ही बहाल केलेली दिसते ती म्हणजे 'हाडाचा शिक्षक', कारण विद्यार्थ्यांसाठी काम करत असताना त्यामध्ये संपूर्ण एकाग्रह होऊन काम करण्याची त्यांची पद्धत दिसून येते.

गणेश चौधरी यांच्या घरी ही शाळा भरलेली असे. शाळा सुटल्यानंतर काही शंका घेऊन विद्यार्थी घरी येत आणि तेथे त्यांचे ज्ञानदानाचे कार्य चालू असे. त्यांचप्रमाणे शाळेत सर्व सण साजरे केले जात असत. त्यामध्ये गणेश चौधरीसरांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असे. गणेश चौधरी यांनी शाळेत गणपती बसविण्याची प्रथा चालू केली होती. तेथे गावांतील सर्व लोक जमत आणि मोठ्या प्रमाणात कार्यक्रम साजरे केले जात होते. गणपती विसर्जनच्या वेळी तर खास कार्यक्रम व नियोजन केले जात असे. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात होते सर्व विद्यार्थ्यांना गणेश सर हे आपलेच आपल्यातील एक असल्यासारखे वाटत आणि त्यांच्या शब्दाला मान देऊन विद्यार्थी झपाटून काम करत होते.

गणेश चौधरी हे शिक्षक म्हणून काम करत असतानाचा काळ आणि त्यांना भास भ्रम होईपर्यंतचा काळ हे दोन्ही काळ पाहिले असता असे दिसून येते की एक शिक्षक म्हणून त्यांनी आपले कर्तव्य पार पाडलेली दिसतात. जेव्हा त्यांना 'भास' होऊ लागले तेव्हा त्यांनी सेवेतून रजा घेतली. म्हणजे गणेश चौधरी यांचे चरित्र पहात असताना आपल्यामुळे विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये त्यासाठी रजा घेणारा शिक्षक आणि नंतर होणाऱ्या भासामुळे काम होत नसल्यामुळे राजीनामा त्यांनी दिलेला होता. त्यांनी राजीनामा दिल्यानंतरच त्यांच्या हातून अपेक्षीत घटना घडलेली दिसून येते. तसे व्यक्तिश: पाहिले तर एक शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कर्तव्य सेवेशी कधीही बेईमान झाले नाहीत. एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांचे व्यक्तीमत्व अल्पशा कार्यातून आपल्याला दिसून येते.

## गणेश चौधरींच्या वेडाचे स्वरुप :

'व्यक्ति तितक्या प्रकृती' असे म्हंटले जाते. गणेश चौधरी यांची एक वेगळी प्रवृत्ती असलेली दिसून येते. त्यांना असे वाटे की, लोक आपल्या विषयी बोलत आहेत असा त्यांचा

भ्रम होता. ते म्हणत की, "कुणीही काहीही म्हणतो" अशी त्यांची तक्रार असायची. यालाच मनोविकारशास्त्रात 'हॅल्युसिनेशन्स' असे म्हणतात. या त्यांच्या भ्रमातून बाहेर काढण्यासाठी त्यांना जळगावला घेऊन सर्वजण गेले पण तिथेही त्यांना ऐकू येऊ लागले. ते म्हणत असत माझ्या विषयी लोक बोलत आहेत. त्यांची समजूत सर्वजन काढत असत पण त्याचा काहीही उपयोग होत नसे कारण जे वेड जळगावच्या डॉक्टरांना समजले नव्हते ते घरातील लोकांना तरी कसे समजणार यामुळे अक्षरक्षः वेडे झाले होते.

गणेश चौधरी 'काचेचं मन'मध्ये सांगतात की, "आत्यंतिक भीती व आत्यांतिक प्रीती हीच वेडाची मूळ असतात. हे उदगारही अर्थपूर्ण आहेत. चौधरींच्या भावजीवनातही कुटुंबीय व अन्य लोक यांना महत्वपूर्ण स्थान आहे. त्यांच्याबद्दलच्या आत्यांतिक प्रीतीमुळे सभ्यतेच्या, प्रतिष्ठेच्या कल्पना चौधरींना कोवळ्या वयात स्वीकाराव्या लागल्या शारीरिक प्रेरणांना डावलून ही सभ्यता राखणं कठीण झालं तसतशी लोक काय म्हणतील ही भावना बळावू लागली आणि हळूहळू प्रेमाची जागा त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या भीतीने घेतली."[७] म्हणजेच लोक त्यांना काय म्हणतील? या भीतीचेच रुपांतर भासामध्ये झाले. आणि ते वाढतं गेल्यामुळे त्यांचे रुपांतर वेडात झाले होते.

गणेश चौधरी 'नागवा' या आत्मकथनामध्ये सांगतात की, "अधिकाधिक स्वत:च्या विचारांच्या गुंगीतच मी राहू लागलो! मला मनातल्यामनात 'बोलायची' सवयच जडली! इतकी की मी रस्त्यानं जातांनाही एखाद्या विषयावर 'लेक्चर' मनातल्यामनात देत चालत असे! व हे लोकांना कळल्यामुळेच लोक मला काहीही म्हणतं! निरनिराळ्या उपमा देण्याची, मनात घोळण्याची सवयचं जडली! 'लोकांना हे कळतयं असं मला कळत तर मी त्याच दहापाच दिवसात वेडा झालो असतो!"[८] येथे स्वत:च स्वत:चे कठीण आत्मपरिक्षण करताना दिसतात. या त्यांच्या सवयीमुळे छोट्या-छोट्या गोष्टीमध्ये त्यांना चोरटेपणा वाटू लागलेला दिसून येतो.

चौधरीनां लोकांचा, शेजाऱ्यांचा संशय येत असे. ते आपल बोलण ऐकतात म्हणून ते त्यांच्या ऐकांतातील वेळी सुद्धा पत्नीला सारखे रागावून बोलत 'हळू बोल' असे सांगत म्हणजे त्यांच्या मनाने घेतलेला संशय आपल्याला जाणवतो. म्हणजेच कोणत्याही

माणसाने मन पूर्णपणे निरोगी नसते. त्यात विक्षिप्तपणाच्या, विकृतीच्या कमी-अधिक प्रमाणात छटा असतातच असे आजचे मानसशास्त्र सांगते आहे. हेच गणेश चौधरींच्या बाबतीत घडलेले होते. या संदर्भात ते तृर्षात काव्यसंग्रहात सांगतात की, "भ्रम, भास, चक्कर यांनी भ्रमीष्ठ झालेल्या रक्ताळलेला हे असध्य आहे. व्यथा, वेदना आणि दुःख याशिवाय काही उरलचं नाही आणि मी का जगलो, कसा जगलो मला काही काहीच कळलं नाही. जितका हा भयानक विस्फोट कसा झाला, का झाला हे कळलं नाही तितकाच फक्त जाणवतात माझ्या मनात होणारे विकृत, विचित्र, विक्षिप्त विचारांचे क्षणोक्षणी होणारे आघात त्या आघातांचे हजारो आवर्तनं, प्रत्यावर्तन आणि त्यांनी दबदेला, भ्यालेला भेदरलेला मी झोपेविना जाणाऱ्या बैचेन रात्री आणि त्यातून पळवाट काढण्यासाठी दारु ढोसणारा मी - ! आणि ज्यानं मला वेडं केले ते माझं - ! 'काचेच मनं', 'पारदर्शक मन', 'नग्न मन'!"[९]

यावरुन गणेश चौधरी यांचे मनच त्यांच्या वेडास कारणीभूत ठरलेले आहे. या काचेच्या मनामुळे त्यांनी जीवनातील अनमोल ठेवा गमावलेला आहे. दुभंगलेल्या व्यक्तीमत्वामुळे आणि मानसिक आजाराने पछाडल्यामुळे गणेश चौधरी यांचे आत्मकथनात दाहकता आली शिवाय प्रतिभाशक्ती आणि वेडेपणाचे सहचार्य त्यांचे विपरीत स्वरुप आपल्याला पाहण्यास मिळते. म्हणजेच चंचल मनोवृत्ती, भावविवशता आणि दुसऱ्याची आत्यंतिक भीती ही त्यांच्या वेडाची कारणे असावीत त्याचप्रमाणे ते आपल्या विचारशक्ती विषयी सांगतात की एका पत्रातून आपल्या भावाला लिहितात, "टोपण काढण्याच्या झटपटीत विचार गायब होतात! म्हणून टोपणावर दाबलं असता खाली येणार बॉलपेन पाठवण्याविषयी त्यांनी एका पत्रात भावाला लिहलं आहे."[१०]

म्हणजे वयाच्या सतराव्या - आठराव्या वर्षापासून या वेडाला उधाण- भरती आली. लैंगिक विचारांमुळे स्वतःच्या शरीराबद्दल त्यांना तिरस्कार वाटू लागला. म्हणजेच लैंगिक आकर्षण व्यक्त होण्यास योग्य सरळ वाट न मिळाल्यामुळे मानसिक पातळीवर विकृत पद्धतीने ती पूर्ण करण्याचा केलेला प्रयत्न दिसून येतो. म्हणजे येथे गणेश चौधरी स्वतःच, स्वतःशी, जीवघेणी, क्रुर अशी लढाई खेळत असल्याचे दिसून येते.

म्हणजेच गणेश चौधरी यांचे वेड हे टप्प्याने वाढत गेलेले दिसते. आधी त्यांना लोकांची भीती वाटत होती. नंतर त्यांना संशय येऊ लागला की त्यांना आपल्या मनातील सर्व कळत आहे. त्याचप्रमाणे तसे त्यांना भास होऊ लागले आणि त्यांचा तो भ्रम वाढतच गेला. आणि त्याचे रुपांतर वेडात झाले म्हणजे गणेश चौधरींच्या मनावर लहानपणापासून झालेले लोकांच्या विचाराचा आघात झालेला आपल्याला जाणवतो. आधी त्यांना येत असलेले वेडाचे झटके त्यानंतर नेनिवेतून जाणीवेत आल्यानंतर त्यांची होत असलेली जाणीव येथे दिसून येते. म्हणजेच मनाच्या आरशामुळे द्विधा व्यक्तीमत्त्वामुळे जीवनाची झालेली ही वाताहात येथे दिसून येते.

## गणेश चौधरींच्यावर झालेले आघात :-

गणेश चौधरींच्या मनावरती लहानपणापासूनच आघात झालेले आहेत. त्यांचे संमिश्र व्यक्तिमत्व असल्याचे जाणवते. म्हणजेच मनाचा अबोध स्तर म्हणजे ईड यातल्या उपजत प्रवृत्ती जन्मापासूनच कार्यरत असतात नणिवेतल्या या प्रवृत्तींना तर्कसंगत नियमाचे बंधन नसते. म्हणूनच त्या अगम्य वाटतात. व्यक्तिच्या मनाचा विकास होत असताना यातूनच जाणीवेचा, इगोचा विकास होत रहातो. हेच चौधरींच्या बाबतीत दिसून येते त्यांच्या या भावना दडपल्या गेल्या आणि या ईडमधून 'तो'ची निर्मिती झाली आहे.

याचप्रमाणे गणेश चौधरी यांच्या मनावर वडिलांच्या प्रतिष्ठेचे तसेच घरच्या वातावरणाचा दबाव होता. घरी वडील आजारी असल्यामुळे आणि आई सारखी शेतात काम करते आणि घरामध्ये असे आनंदी, मोकळे वातावरण नसल्यामुळे त्यांच्या मनावर आघात होत होता. ''प्रत्येकाच्या मनात मोठ्यांच्या आज्ञा पाळणारं मूल सदैव कार्यरत असतं. नैतिकतेच्या सभ्यतेच्या संस्कारानुसार एक शिस्त मनाला लागते. आपल्याहून वरचढ अशा शक्तीचा आधार वाटणे आणि भिती वाटणे अशी ही द्वंदात्मक प्रेरणा असते. आई-वडिलांचा धाक आणि परमेश्वराची भयमिश्रीत ओढ ही या सुपर ईगोची देणगी आहे. घरातील वडील माणसांचा दरारा आणि प्रेम, अवास्तव नैतिकतेचे कोवळ्या वयातले संस्कार यामुळे चौधरींच्या मनातही द्वंदात्म प्रेरणा निर्माण झाली आणि या सुपर ईगोच्या धाकापोटी ते

भावना दडवू लागले, दडपू लागले. त्यातूनच आदर्शाच्या मेणाच्या बाहुल्याकरुन टाकणारा ईडमधील 'तो' निर्माण झाला''[११]

लहाणपणी त्याच्यावर आणखी एक आघात झालेला तो म्हणजे बहिणीचा (ताईचा) मृत्यू, या मृत्यूमुळे त्यांना मृत्यू म्हणजे काय? याविषयी ते विचार करायला लागले. म्हणजेच त्यांच्यावर अत्यंत प्रेमकरणारी त्यांची ताई अचानक फक्त पायाला खिळा लागल्याचे निमित्त होऊन मरण पावली. या गोष्टीमुळे त्यांच्या मनाला अत्यंत दु:ख झाले होते. 'नागवा' या आत्मकथनामध्ये ते सांगतात की, 'माजघरात पोहचलो तो तिथे माझ्या लाडक्या ताईचे प्रेत होते. आजुबाजुला वाड्यातील बाया बसल्या होत्या. आणि नीरव शांतता होती. मी बेभाणपणे ताईच्या प्रेताजवळ गेलो.... आणि ओरडू लागलो, 'ताई, ताई........' मला प्रचंड धक्का बसला होता. माझ्या डोळ्यात अश्रुंचा टिपूस देखील नव्हता. त्या अकल्पित आघातातं मी नुसता सून्न होऊन गेलो होतो! त्या बधिरपणात मला काहीच सुचत नव्हत.......''[१२]

गणेश चौधरी यांच्या मनावर लहानपणापासून आघात झाले. पण त्यांचे मन कोणी समजून घेतलं नाही किंवा त्यांनी ही आपल्यामनाला मोकळे होऊन दिले नाही. त्यांना मनाच्या विरोधात किंवा उलट प्रवाहात पोहतचं राहण्याची सवय झाली. हेच मन कोणाला समजू नये म्हणून त्याला झाकण्याच्या प्रयत्नातचं ते कधी उघडे झाले आणि लोकांनी त्यावरच्या भाव-भावना समजू लागल्या या भ्रमाने शेवटी त्याचे रुपांतर वेडात झाले.

माणूस म्हटल्यानंतर त्याला मन असते. सुष्ट आणि दृष्ट दोन प्रवृत्ती असतात. पण गणेश चौधरींना अनेक मन आणि सुष्ट/सभ्य प्रवृत्ती यांचीच वाढ करण्याच्या नादात त्यांची दृष्ट प्रवृत्ती उफाळून वर आली. आणि त्याचे रुपांतर 'लोक काहीही बोलतात' पासून सुरुवात झाली. आणि त्यांचा शेवट म्हणजेच त्यांच्या जीवनातील अनमोल व्यक्ती गमावून झाला. शेवटी त्यांच्या काचेच्याच मनाने त्यांच्यावर घातलेला घात आपल्याला दिसतो. मन असावं पण ते काचेचं नसावं कारण त्यामध्ये कोणालाही सहज पाहता येईल ऐवढा पारदर्शकपणा नसावा त्यामुळे स्वत:चीच हाणी होते. अशाच मनाने गणेश चौधरींचा घात आपल्याला 'नागवा' व 'काचेचं मन'मधून पहाण्यास मिळतो.

## गणेश चौधरींच्या हातून घडलेले कृत्य व शिक्षा :

गणेश चौधरी यांना 'हॅल्युसिनेशन्स' या त्रासामुळे सर्वच त्यांची समजुत काढून थकले होते. या त्यांच्या भ्रमाचे रुपांतर कधी वेडात झाले हेच घरच्या मंडळींना समजले नाही. या वेडाच्या भारातच त्यांनी त्यांच्या प्रिय पत्नीला आणि तीन मुलांना मुसळाने चेचून ठार केले. ही घटना दिनांक ३० जून १९६८ रोजी घडली. प्रचंड आवेगी झटक्यात हे भयंकर कृत्य त्यांच्या हातून घडले होते.

'स्क्रिझोंफ्रेनिया' या पुस्तकात दिवाकर चौधरी सांगतात की, ''तुषार, तुषार! असा आवाज ऐकू आला अरे हा तर गणेश सरांचा आवाज! एवढ्या लांबूनही ऐकू येतोय! केवढ्यानं ओरडतोय तो। माझ्या छातीत धस्स झालं. म्हणजे तुषार पडला काय आणखीन? मी धावतच घराकडे आलो, तो घराजवळ प्रचंड गर्दी. ओट्यावर व खालीही मी एकदम घाईतच एकाला विचारलं, काय झालं म्हणून त्यान फक्त घरात जा म्हणून सांगितलं. घरात येऊन पहातो तो प्रेतांचा खच पडलेला. वहिनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली. तुषार व राजेंद्र दोघेही गीताजली खाटेवरच...''[१३] हे दृश्य पाहून त्यांना डोळ्यासमोर अंधारीच जमलेली होती. कारण हे वेड इथपर्यंत जाईल असे कोणाला वाटले नाही. आई आणि वडिलांची प्रकृती आधीच ढासळलेली आणि त्यामध्ये हे झालेले कृत्य बघून त्यांच्यावर झालेला प्रहार तर वेगळाच. तसेच घरात दोन महिन्यापूर्वी नविन आलेली नवरी, ह्या दृश्याने सर्वांच्या अंगावर काटा उभा राहिला होता.

गणेश चौधरींना या कशाचेच भान नव्हते. आपण काय केले आहे हेही त्यांना समजत नव्हते. ते फक्त तुषार! तुषार! असे ओरडत उपडा पडलेले होते. पोलिस आले त्यांनी ही प्रेते पोस्टमार्टेमसाठी घेऊन गेले नंतर मात्र एक घोर शांतता पसरलेली होती. नंतर पोस्टमार्टेम झाल्यावर प्रेतं ९ वाजता घरी आणली. वहिणीला चिता दिली आणि त्या बाल गोपालांना द्राक्षाच्या मळ्यात पुरण्यात आले त्यावेळी दिवाकर चौधरी यांचे अंतकरण भरुन आले. त्यांना अनेक जुन्या गोष्टी आठवत होत्या. ते सांगतात की, ''आता वहिनी खरंच चाली अं....वहिनी, काय झालं हे। पाच वर्षापूर्वी तर तू या घरात आलीस पाच वर्षांपूर्वी तर गणेशदादा या घरात वरात घेऊन आले होते. सर्व आनंदीआनंद होता. तुला आठवतं का?

संध्याकाळी पंक्तीच्या वेळेस वादळ सुरु झालं होतं. पण लगेच रोहिणी नक्षत्राचा पाऊस सुरु झाला होता. सगळेच म्हणाले. शुभ शकून.......मग असं कसं झाल? वरात परत आल्यानंतर नवरीचं नांव ठेवायची वेळ आली. तुझे नाव मी 'शारदा' ठेवलं. वहिनी लक्ष्मीपुजनाच्या वेळेस तू अंगठी जिंकलीस. मग असं कसं झालं?''[१४] येथे दिवाकर चौधरी यांनी आपल्या भाव-भावनांचा उद्रेक केला आहे. काय होत आणि काय झाल? अस सर्वांना वाटू लागलेल आहे.

पण आता चक्र चालू झाले ते म्हणजे कार्ट-कचेरी याचं. गणेश चौधरी यांना शिक्षा होणार यात काही शंका नव्हती. पण त्यांना कमी शिक्षा व्हावी आणि त्यांना उपचारासाठी मनोरुग्णालयात पाठवावे असे वाटे पण गणेश चौधरी यांनी गुन्हा कबुल केल्यामुळे केस पक्की झाली होती. ७ डिसेंबर १९६८ या दिवशी खटल्याचा निकाल लागला होता. गणेश चौधरींना 'फाशीची शिक्षा' देण्यात आली होती. हे ऐकून दिवाकर चौधरी यांचे मन खचून गेले होते. पण आई-वडिलांना आधार देणे गरजेचे होते. त्या रात्री त्यांनी न्यायाधिशांशी बराच वेळ हुज्जत घातली होती. ज्या कोर्टात बाबांचा दरारा होता. तिथेच त्यांना मान खाली घालावी लागली होती. पण सर्व अपमान सहन त्यांनी केला होता. त्यांची फक्त एकच इच्छा होती. ती म्हणजे त्यांच्या मुलाला उपचार मिळावा त्याची मानसिक स्थिती समजून निकाल द्यावा पण तसे घडले नव्हते. आज ते फारच खचलेले दिसत होते.

फाशीची शिक्षा झाल्यानंतर दिवाकर चौधरी यांनी सुप्रिम कोर्टात आपील करण्याचे ठरविले. त्यावेळी गणेश दादाचं पत्र आल. त्यामध्ये ते म्हणतात की, ''एके दिवशी गणेशदादाचं अचानक पत्र आलं. अधाश्यासारख पत्र फाडल आणि एका दमात वाचल. अक्षर पाहूनच ते कशा अवस्थेत लिहिलं असेल याची जाणीव झाली. नाही तर याचं अक्षर किती सुंदर वळणदार. आपील नको म्हणून त्यानं लिहिलं होत. बऱ्याच वेळा तेच वाक्य आणि वाड्यातील पुष्कळांची नांव आणि नमस्कार! मजकुर काहीही असला तरी पण निदान पत्र तर आलं. थांबवेना रात्रीच्या गाडीनं नागपुरला जायला मी व मावसभाऊ पेमा निघालो.''[१५] गणेश चौधरीचे हे पत्र वाचून त्यांची समजूत घातली. बाबांनी नागपूरला जाऊन त्यांची सही घेऊन हायकोर्टात आपील केले. पण तेथे ही काही उपयोग झाला

नाही. त्यांना फाशीचीच शिक्षा कायम करण्यात आली. त्यामुळे घरावर एक अंधकार पसरला होता. त्यानंतर सुप्रिम कोर्टात आपील करण्यात आले. येथे राजेंद्र वकीलांमार्फत दिल्लीचे गोखले वकील लावले होते. पण तारीख जवळ यायच्या आगोदरच गणेश दादाची फाशी रद्द झाली होती. ही बातमी पितांबर दाजी यांनी सांगितली होती. पण तार जळगावहून एन. डी. सर घेऊन आले होते. त्यावेळी आमचे घर आनंदान झुमत होत. आता चौदा वर्षाचाच फक्त प्रश्न होता. कमीत-कमी तो जिवंत असल्याचा आनंदच आम्हाला झाला होता.

फाशीची शिक्षा याचे रुपातर जन्मठेपेमध्ये होण्याचे कारण म्हणजे महात्मा गांधी जन्मशताब्दीनिमित्ताने या शिक्षेचं रुपांतर जन्मठेपेत झाले. त्यानंतर त्यांची रवाणगी नागपूर तुरुंगात झाली. त्या वेडाच्या भरात किंवा भ्रमात त्यांच्या हातून हे कृत्य घडले होते. म्हणजे नियतीच्या मनात काही वेगळेच होते. त्यांच्या हातून, वेडाच्या भरात झालेल्या चूकीचे प्रायश्चित घेण्यासाठी त्यांच्या हा पुर्णजन्म झाला होता असे आपल्याला वाटते.

## जेल आणि मनोरुग्णालयापर्यंतचा प्रवास :-

गणेश चौधरी यांना नागपूर जेलमध्ये पाठविण्यात आले होते. त्यांना त्यांच्या स्थितीचे, अवस्थेचे भान नव्हतेच. आपल्या हातून हत्या झाली आहे. याची खंत सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर नव्हती. ते जेलमध्ये होते. तेव्हा सुद्धा त्यांची एक सारखी बडबड सतत चालूच होती. त्यावेळी सरकारच्या नियमाप्रमाणे आरोपीला पहाण्यासाठी आठवड्यातून एकदा एक डॉक्टर येई. त्याचप्रमाणे १९६९ मध्ये डॉ. अडबे मनोरुग्ण तपासण्यासाठी नागपूरला सेंट्रल जेलमध्ये नेहमीप्रमाणे आले. त्यावेळी त्यांना फाशीगेटमधील एक कैदी दाखवण्यात आला. त्यांनी पत्नीचा व तीन मुलांचा खूण केल्यामुळे त्यांना फाशीची शिक्षा झाली होती. अडबे त्यांच्या खोलीजवळ गेले तेव्हा तो नग्नावस्थेत होता. चेहरा संतापलेला होता. आणि तोंडाने अखंड शिव्या चालू होत्या बरोबरच्या मेडिकल ऑफिसरने डॉ. अडबेंची ओळख करुन दिली. ही त्यांची पहिली ओळख होती. चौधरींच्या जीवनाची शोकांतिका इतर अनेक गुन्हेगार मनोरुग्णांप्रमाणेच काळाच्या पडद्याआड गेली असती पण सुदैवाने डॉ. अडबेंची भेट झाली आणि चौधरींमधला दडपला गेलेला माणूस जागा झाला.

डॉ. अडबें यांनी त्यांच्या ३ ते ४ वेळा सिटींग आटोपल्यावर त्यांच्यावर ट्रिटमेंटसाठी त्यांना मनोरुग्णालयता पाठविण्यासाठी सरकारला त्यांचा संपूर्ण रिपोर्ट पाठविला आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आले. मनोरुग्णालयात आल्यावर त्यांच्याशी त्यांनी मैत्रीपूर्ण वातावरण ठेऊन त्यांना दोन बाऊंड बुक कोऱ्या पानांच्या वह्या आणून दिल्या. कारण गणेश चौधरींच्या मनामध्ये दोन प्रवृत्तींचा झगडा चाललेला असे. म्हणून त्यांच्या सांगण्यावरुन सृष्ट आणि दृष्ट प्रवृत्तीचा, आणि ज्या वेळेस ज्या प्रवृत्तीचा जोर असेल तशी त्यांची वागणूक असायलची त्यानी दिलेल्या दोन बाऊंड बुकापैकी एकामध्ये जेव्हा वाईट विचार येतील ते लिहायला सांगितले व चांगले विचार येतील तेव्हा दुसरे बुक उपयोगात आणावयास सांगितले व तशी तिथल्या गार्डस्नाही सूचना दिली. त्याप्रमाणे त्यांना पाहिजे तसा रिपोर्ट मिळाला. चांगल्या बुकमधून चांगले साहित्य कविता लेखन होऊ लागले आणि वाईटमधून वाईट अक्षर, अश्लिल विचार यांचे लेखन झालेले दिसून आले. त्यांना योग्य उपचारानंतर प्रकृतीत हळूहळू सुधारणा होऊ लागली.

डॉ. अडबें विषयी गणेश चौधरी म्हणतात की, ''प्रत्येकाच्या जीवनात असे काही प्रसंग व अशा काही व्यक्ति येऊन जातात की हे का घडावे याचा संभ्रम पडावा किंवा सहवासाच्या सुखद आठवणी, मदतीची जाणीव पुष्कळ काळापर्यंत मनात घोळत रहावी. पूर्वजन्मीचे काही लागेबंध या पलिकडे त्याला दुसरे उत्तर असल्याचे माझे ऐकिवात नाही. श्री गणेश हे चांगले कवी आहेत, चांगले शिकलेले आहेत असे ते तेथे दाखल होण्यापूर्वी मी ऐकले होते. त्यामुळे हेच ते 'गणेश' समजल्यावर कुतुहल पुष्कळच वाढले.''[१६]

गणेश चौधरी मनोरुग्णालयात आले त्यावेळी त्यांची असणारी स्थिती मनोरुग्णालयात आपण किती दिवस होतो याची जाणीव असलेली दिसून येत नाही. तिथल्या कर्मचाऱ्यांनी त्यांची घेतलेली देखभाल जेव्हा ते शुद्धीवर आले तेव्हा त्यांना ते सांगत होते. त्यांना काहीच घटना आठवत होत्या. काही घटणांची आठवत ते कर्मचारी सांगत होते या संदर्भात ते 'नागवा'या स्व-आत्मकथनामध्ये म्हणतात की, ''काहीजण मला कृतघ्न म्हणतील, ज्या अनुचर सुखदेवनं मला मोठ्या आत्मीयतेनं अनेकवेळा खाना खिलवला तो 'खाना खाऊन मी विसरलो' म्हणून! अन्नाला जागला नाही. सेवा विसरला वगैरे वगैरे दोषारोप करुन ते विचारतील की, काय रे वेड्या, हरामखोरा, तुला तुझी

'प्रार्थना' कशी आठवते-? तुझे ते घाणेरडे, सडके, विचार कसे आठवते...? पगलट प्रसंग कसा आठवतो?''[१७]

गणेश चौधरीच्या लेखणांस सुरुवात मनोरुग्णालयातच झाली. आधी त्या बुकच्या माध्यमातून लेखन केले. नंतर त्यांनी पत्राचे माध्यम घेतले. म्हणजेच त्यांच्या मनातले वादळ मोकळे करायला पत्रांप्रमाणेच कवितेचे माध्यम मिळाले. ते कविता लिहू लागले. आकाशवाणीसाठी त्यांनी नभोनाट्ये लिहिली. त्यांच्या आत्मविश्वास वाढण्यास त्यामुळे मदतच झाली. त्यांच्या 'तृषार्त' हा काव्यसंग्रहाचे डॉ. वि. भी. कोलते यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाकडून 'केशवसुत पुरस्कार' मिळाला. त्यानंतर चौधरी यांचे अनेक काव्यसंग्रह, एकांकिकासंग्रह आणि लेखसंग्रह, प्रसिद्ध झाले. म्हणजे गणेश चौधरी हे नाव रसिक जाणकारांना माहित झाले. पण यांची सुरुवात झाली ती डॉ. अडबेंच्या दिलेल्या वह्यांमधून एक चांगल्या प्रवृत्तीची आणि व्यक्तीची ओळख झाली.

त्याचप्रमाणे साहित्यलेखनाबरोबर त्यांनी १९७२ मध्ये मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना मनोरुग्णांच्या वतीने 'मानपत्र' लिहिले. त्यात वेड्यांची कैफियत मार्मिक शब्दांमध्ये लिहिली आहे. शासनाचा आणि समाजाचा गुन्हेगार मनोरुग्णांकडे पाहण्याचा आजचा जो दृष्टीकोण आहे त्यातील विसंगती त्यांनी अचूक दाखवल्या आहेत. गुन्हेगार मनोरुग्णाना जेलमधून मनोरुग्णालयात पाठवलं जात. आणि ते बरे झाले की सजा भोगायला पुन्हा जेलमध्ये पाठवतात. जाणिवेत आलेल्या मनोरुग्णांना निरोगी जीवन जगण्याची संधी वैद्यकिय उपचारांनी दिलेली असते. ती गुन्हेगारीचा शिक्का मारुन हिरावून घेतली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या पत्रांवरुन गुन्हेगार, मनोरुग्ण आणि समाज यांच्या संबंधावर प्रकाश पडतो. चौधरींच्या कुटुंबियांनी त्यांना समजून घेतले. त्याचप्रमाणे नियमांच्या चौकटीत राहून वरिष्ठ अधिकारी, डॉक्टर यांनीही चौधरीना माणसात आणण्याचा प्रयत्न केला आहे. गणेश चौधरीनी मनोरुग्णालयात अनेक उत्सव साजरे केले आहेत आणि तिथला प्रत्येक रुग्ण आणि कर्मचारी तसेच तिथला प्रत्येक क्षणाचे ऋण ते माणतात. तिथल्या प्रत्येक वस्तूची आठवण त्यांनी तितक्याच आत्मीयतेने केली आहे.

श्री. चौधरी यांना या रुग्णालयात एक विशिष्ठ स्थान प्राप्त झाले आहे. ते 'तृषार्त' या काव्यसंग्रहात 'लागेबांधे' मध्ये सांगतात की, ''तसे पाहिले तर गुन्हा आणि वेड या

अेकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जीवनाच्या जुगारात हे नाणे कोणत्या बाजूवर पडते. अेवढेच फक्त पहावयाचे असते आता हा 'जुगार' केव्हा आणि कसा सुरु होतो याचे विवेचंन खुप करता येईल. पण ते येथे अप्रस्तुत ठरेल. एक मात्र नक्की की आयुष्यात आलेल्या विलक्षण असहायतेच्या वा वैफल्याच्या जाणीवेतून मार्ग काढण्यासाठी ही निकडीची व निर्णायक नाणेफेक होते."[१८] म्हणजेच गणेश चौधरी यांचे नेनिवेते आल्यानंतर त्यांना जाणवलेले जीवनाचे हे तत्वज्ञान आहे. त्याचबरोबर गणेश चौधरी यांना मनोरुग्णालयात असताना रजतेच्या मुद्दतीत बाहेर सोडण्यात ही आले होते. त्यांना येथुन लवकर  सुटका व्हावी म्हणून अनेक अधिकाऱ्यांनी त्यांच्यासाठी अनेक प्रयत्न ही केले होते.

गणेश चौधरींच्या मनातील वादळ आता शांत झाले होते. पण ते शांत करण्यासाठी आणि त्यांना माणसात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले ते म्हणजे डॉ. अडबें यांनी त्यांच्यातल्या सृजनशील प्रतिभेला वाव देण्याबद्दलचे श्रेय अडबेंच्या बरोबर डॉ. य. बा. केळकर, श्री. लभ्भे या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांकडे जाते. आणि अर्थातच त्यांचे भाऊ दिवाकर चौधरी यांच्याकडेही जाते. दिवाकर चौधरींनी आपल्या भावाला मानसिक, शारिरीक आधार देण्यासाठी आपले सर्वस्वपणाला लावले. गणेश चौधरींच्या भावना जपण्याचा आटोकाट प्रयत्न केला. म्हणजेच हे वादळ शांत करताना त्याच्या भावनांचा विचार करुन येथे त्यांना सजजून घेतले आहे. या प्रवासात अनेक स्थित्यंतर झाली. पण त्यामध्ये एक चांगली गोष्ट घडली म्हणजे त्यांच्याकडून झालेले साहित्य लेखन. हे आज महाराष्ट्राच्या शारदेच्या गळ्यातील अनमोल लेणे आहे.

## पागलखान्यातील कवी व इतर साहित्या लेखन :-

गणेश चौधरी कवी किंवा साहित्यिक होण्यापाठीमागे डॉ. अडबें यांची प्रेरणा असलेली दिसते. गणेश चौधरी यांना डॉ. अडबें यांनी चांगले आणि वाईट विचार लिहिण्यासाठी जाड बांधणीच्या वह्या दिल्या होत्या. त्यातूनच त्यांच्या चांगल्या वहितून चांगले काव्य लेखन केले होते. हे लेखन त्यांनी त्यांच्या पत्नीला दाखविले. त्यांच्या पत्नीने त्याचे वाचन केले. यातून ते आपल्या मानसिक स्थिती गतीचे वर्णन करतात.

त्यांच्या कवितेतून त्यांनी सांगितले होते की, ''हे जग अजगर भासते, अन् रात्रीला असताना जिव्हा दहा!'' या कवितेतून देखील 'अजगर' ही प्रतिमा पुरुष इंद्रियाची आहे. आणि रात्रीला जिव्हा दहा, यातून ही त्याला होत असलेल्या शब्दभ्रम व ध्वनीभ्रमांचेच चित्रण त्यांने केले आहे. तसेच ''पंखा फिरतो आणि मजला फिरवतो'' ही कविता देखील त्यांच्या मानसिक ताणाचेच चित्रण आहे.''[१९] म्हणजे त्याच्या मानसिक स्थितीचे केलेले पृथक्करण होते.

'तृषार्त' हा काव्यसंग्रह १९७४ मध्ये मनोरुग्णालयात नागपूर येथे प्रकाशित झाला. याचे सर्व श्रेय डॉ. केळकरसाहेब व श्री. लेम्भेसाहेब यांना जाते. या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाचे मानाचे 'केशवसुत परितोषिक' १९७६ साली प्राप्त झाले. हा काव्यसंग्रह लेम्भेसाहेबाच्या मुळे आज पाहण्यास मिळतो. १११ कविता 'तृर्षात' मध्ये आहेत. या काव्यसंग्रहाला प्रस्तावना ग. त्र्य. माडखोलकर यांनी लिहीली आहे. ते प्रस्तावनेत सांगतात की, ''माझी प्रकृती बरी नव्हती शिवाय, वयोमानानुसार बहिरेपणा आलेला असल्यामुळे काव्यवाचन किंवा काव्यगायन ऐकण्याच्या स्थितीतही आता मी राहिलेलो नाही. तरी देखील, त्या दिवशी श्री. चौधरी यांना पाहिल्यावर, माझ्या मनात एकदम काय झाले कोण जाणे! श्री मामासाहेबांनी केलेली त्यांची कविता ऐकण्याची विनंति मी तत्काळ मान्य केली. त्याचबरोबर श्री चौधरी यांनी आपल्या 'अश्रु', 'गुन्हेगार' आणि 'वेड' अशा तीन कविता मला म्हणून दाखवल्या त्या म्हणत असताना त्यांच्या अंगात संचारलेला जोश, त्यांचे डोळे, ओठ आणि नाकपुड्या यांचे होणारे स्पंदन व मधून-मधून झपाटल्यासारखे होऊन ते करीत असलेले हातवारे यांनी माझे लक्ष वेधून घेतले आणि माझ्या मनात विलक्षण सहकंपा त्यांच्या विषयी उत्पन्न झाली. त्या भारात मी या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहीण्याचे कुबूल केले.''[२०]

काव्याप्रमाणेच गणेश चौधरींच्या मनातील वादळ मोकळे करण्यासाठी पत्राचे ही माध्यम मिळाले. त्यांनी आपल्या या पत्रांची सुरुवात अशाच दोन वह्यांमधून केलेली होती. गणेश चौधरींनी नागपूरच्या सेंट्रल जेलमधून, मनोरुग्णालयातून आईला, भावाला, नातेवाईकांना अनेक सविस्तर पत्रे लिहिली. तसेच साहित्यिकांना, मित्रांना पत्रे पाठवली.

त्यातली काही निवडक पत्रे 'काचेचं मन' या संग्रहात घेतलेली आहेत. या पत्रातून त्यांनी स्वत:चे वेड आधी लपविले. नंतर डॉक्टरांनी त्यांच्या मानसिक आजाराकडे दुर्लक्ष केले. म्हणजेच कोणताही आडपडदा न ठेवता आता तरी मन मोकळे करावे ही त्यांची मानसिक गरज होती. आणि हीच पत्रे लिहिण्यामागची एक प्रमुख प्रेरणा आहे. त्याचप्रमाणे साहित्याचा आविष्कार म्हणूनही या पत्रांना वेगळ महत्त्व आहे. त्यांनी या पत्राच्या माध्यमातून आपले आत्मकथन मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

गणेश चौधरी यांनी कविता आणि पत्रलेखनाबरोबरच अनेक एकांकिका लिहिल्या आहेत. त्यामध्ये 'सूर्य मध्यरात्रीचा आणि दोन एकांकिका' या एकांकिकांमधून त्याची अल्प क्षरत्वाची साक्ष होते. या एकांकिकाच्या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात की, ''मराठी टीकाकार, वाचकांचे लक्ष पुन्हा एकदा स्पष्टपणे गणेशदादाकडे गेले मराठीतील नामवंताची पत्रे येऊ लागली. प्रत्यक्ष भेटी सुरु झाल्या. 'ललित' मध्ये थोर समीक्षक मराठी वाङ्‌मयाचे अभ्यासक प्रा. म. वा धोंड यांनी ह्या 'काचेच्या मनावर' लिहलेले आणि ते या गूढरम्य लेखनाने भारावून गेले. यांच साऱ्या सत्काराच्या क्षणी मी व्यक्तीश: लक्ष घालून, गणेशदाच्या एकांकिका प्रसिद्ध करण्याचे ठरविले.''[२१]

'स्क्रिझोफ्रेनिया' हे पुस्तक दिवाकर चौधरी यांनी लेखन केले. त्यामध्ये गणेश चौधरींनी केलेले लेखन किंवा त्यांचा जीवनवृत्तांत आलेला आहे. यातून आपल्याला गणेश चौधरीचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या वेडाची स्थिती यांच्या उल्लेख आला आहे. या पुस्तका वर अनेक वाचकांनी तसेच समीक्षक, लेखक, आणि कै. वि. भी. कोलते यांनी 'स्क्रिझोफ्रेनिया'वाचून त्यावरती आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. ते सांगतात की, ''आपली 'स्क्रिझोफ्रेनिया' वाचली. मन गलबलून गेले. गणेशदाचं जीवन आपण अतिशय आपुलकीने आणि तळमळीने वर्णन केले आहे. त्यातून 'घटने पूर्वीच्या' त्यांच्या दुभंगलेल्या व्यक्तिमत्वाचे धागे-दोरे हाती लागतात''[२२] त्यानंतर लगेच त्यांनी 'तृषार्त' या काव्यसंग्रहावर दै. लोकमत च्या नागपूर आवृत्तीतून एक प्रदीर्घ समीक्षात्मक लेखही लिहिला आहे. त्यानंतर 'स्क्रिझोफ्रेनियावर 'मॅजेस्टिक'चे प्रकाशक श्री. उमाकांत ठोमरे व श्री. अशोक कोठावळे यांनी प्रक्रिया दिल्या आहेत. तसेच 'राजस'चे संपादक विजय हरी वाडेकर, श्रीमती निर्मला देशपांडे, श्री. मनोहर जाधव तसेच श्रीमती तैमुरमल्ला बानू इ.

अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. गणेश चौधरींनी आतापर्यंत जे लेखन केले. त्यातून त्यांची मानसिकता त्यांचे मन व्यक्त केले आहे. हे अपल्या 'तृषार्त' या संग्रहातील 'अश्रू' या कवितेतून दिसते म्हणजेच,

> ''सर्वस्व गेले कंगाल जाहलो
> सर्वच गेले एकटाची उरलो
> गतस्मृतींचा अता आसरा
> अशाच वहातील अश्रुराधा''२१

यावरुन गणेश चौधरींच्या मनाची स्थिती आपल्याला दिसून येते. एका दुभंगलेल्या व्यक्तीच्या मनाची गाथा आहे.

## जेलमधून बाहेर पडल्यानंतरची परिस्थिती :-

गणेश चौधरींना जन्मठेपेची शिक्षा झाल्यानंतर त्यांना दोनवेळा रजेच्या कालावधीत ते बाहेर आले. त्यानंतर त्यांनी बाहेर येण्यासाठी प्रयत्न ही केले होते. त्यामुळे ११ वर्षाची शिक्षा भोगून ते बाहेर पडले. १० सप्टेंबरला गणेश चौधरींची सुटका होणार होती. ही तार नागपूरहून आली होती. त्या सर्व आनंदात आम्ही होतो. आमच्याप्रमाणे सर्व डांभूर्णी गाव ही आनंदात होते. पण त्यांना डायरेक्ट डांभूर्णीत आणायचे नाही. त्यांना जळगावला काही दिवस ठेवायचे ठरले. त्यांना केशवनानांच्या घरात ठेवण्यात आले.

जळगावला त्यांना ठेवणे तस परवडत नव्हंत पण त्यांच मन रमावे त्यांना जुन्या आठवणीची आठवण होऊ नये म्हणून तिथे ठेवण्यात आले होतो. तिथे राहून त्यांनी त्यांच्या साहित्यिक कंपू तयार केला आणि त्यांच्या कवितेच्या मैफिली जमू लागल्या. त्यावरती त्याचा खूप खर्च होत असे. पण गणेश चौधरींना बरे वाटावे म्हणून दिवाकर हे सर्व सहन करत होते.

त्यानंतर गणेश चौधरी यांनी अनेक संमेलनात कविता वाचन केले. त्यांनी पुणे येथे संमेलनात अचानक कविता वाचनाची परवानगी मिळाली आणि त्यांनी 'बिंदू' कविता वाचली. यावरती 'सकाळ' मध्ये गणेश चौधरींच्या बिंदूच्या अस्तित्वाची व्यथा जबरदस्त मांडली आहे. त्यानंतर अकोल्याला झालेल्या संमेलनात कविता वाचन केली. त्यावेळी त्या

संमेलनात अनेकांची टर लोक उडवीत होते. त्यावेळी त्यांनी 'नागवा' ही कविता वाचायला सुरुवात केली. त्यावेळी ते म्हणतात की, "मी जन्मलो तेव्हा नागडाच होतो." काही लोक हसले पण "तुम्ही कसे होता?" ही दुसरी ओळ येताच सर्व चूप! नंतर मात्र पीनड्रॉप सायलेंन्स आणि कविता संपली तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट! गो. नी. दाण्डेकरांनीसुद्धा कविता लक्षपूर्वक ऐकली."[२४] त्यानंतर मात्र बार्शी आणि चंद्रपूरचा अनुभव मात्र वेगळा होता. तेथे कविता वाचन करण्यास न मिळाल्याने काही कवींनी कंपू करुन कविता वाचन केले. त्यामध्ये अनेक मुलांनी त्यांच्या स्वाक्षरी घेतल्या.

सुटकेनंतर पहिल्यांदाच त्यांनी जळगावला सर्व कुटुंबासमवेत दिवाळी साजरी केली. त्यामुळे दादाच्या कार्यक्रमात बदल होऊन आता तो संपूर्ण बाळगोपाळात रमत होते. नंतर आई डांभूर्णीला आली. त्यांचे काम करण्यासाठी लक्ष्मीला ठेवण्यात आले. ती सर्व काम करत असे आणि त्यामुळे त्यांचे मन रमत होते. पण या सर्वांसाठी खर्चही फार होत असे त्यामुळे दिवाकार यांना कर्ज काढावे लागत होते हे कसे कुणास ठाऊक गणेश सरांना समजल्यानंतर त्यांनी डांभूर्णीला ते तेलेमळ्यात ३ जुलै १९७८ च्या दिवशी ते त्या मळ्यात रहाण्यास आले होते.

गणेश चौधरी यांनी तेथे झोपडी करुन राहण्यास सुरुवात केली. तिथे अनेक लोक येत. गप्पा मारत. आता गप्पाचं ठिकाणचं ते झाले होते. दिवाकर चौधरींना, गणेश चौधरी हे गावांत आले याचा आनंद झाला. पण त्यांना जुन्या आठवणी येऊन ते पुन्हा वेडे होऊ नये म्हणून दिवाकर त्यांची काळजी घेत होते. गणेश चौधरी यांना तिथे असताना लग्नासाठी स्थळ ही आले होते. पण त्यांनी साफ नकारले होते. पण कधी कधी त्यांच्या डोक्यात नव नवीन खुळ येत असे त्याप्रमाणे त्यांनी एकदा दिवाकरला बाई पाहिजे म्हणून मागणी केली होती त्यावेळी त्यांनी शेजारच्या एका खेड्यातून सर्व काम करणारी त्याच्या जवळ राहण्यास तयार असणारी एक बाई त्यांनी मळ्यावर आणून ठेवली हे सर्व करण्यापाठीमागचे कारण म्हणजे त्यांच्या भ्रम, वेड उफाळून वर येऊ नये. करण डॉक्टरांनी त्यांना सांगितले होते की असे पेशंट एक तर आत्महत्या करतात नाहीतर खून करतात. यामुळे त्यांचे मन जपण्याचा प्रयत्न दिवाकर चौधरी करत होते.

कल्पना ही एकदा दादांना समजवण्यासाठी म्हणून त्यांना म्हणते की, "दादा इतकी पेत जाऊ नका तुम्हाले शोभत नाही ते त्याच्यानं बाया नाराज होत."

झाल! एकदम स्फोटच झाला "तू या घरातली सून असं म्हणते? माले वाटलं तून पत्र पाठवले, तू गैन्ही चांगली अस्सीन अन तू माझ्या आपमान करती?"[२५] ऐवढे म्हटल्यानंतर ते भर उन्हात जळगावला जातात त्याच्या पाठीमागून पंढरीबावा जातो. त्यावेळीपासून त्यांना कोणी काहीच म्हणत नसत. तेथून आल्यानंतर ते थेट वाड्यात आले आणि आपली वाटणी मागू लागले. तसे पाहिले तर दिवाकरला आनंद झाला. कारण त्यांच्यावर जबाबदारी पडली तर हा सुधारेल म्हणून त्यांना वाटून देण्यास तयार झाले होते. पण हे खुळ दुसऱ्याच दिवशी संपून गेले. दादा वाड्यात आल्यामुळे त्याच्या भवती सर्व मुले जमत असत आणि यामुळे दादाचे मन ही रमत होते. पण दादाना घरच्या आर्थिक स्थितीची माहिती झाल्यामुळे आपण ही धंदा करावा म्हणून ते प्रयत्न करु लागले. त्यासाठी कोळशाचा, कापसाचा, रसवंतीचा धंद्यासाठी कच्चा मालाची पाहणी केली आणि नंतर त्यांचा हाही बेत रद्द झालेला दिसून येतो.

एकदा कामानिमित्त जळगावला गेलो असता. तेथे विठ्ठल वाघ आले होते. त्यावेळी त्यांच्या कार्यक्रमाची आठवण सांगतात की, "विठ्ठल वाघ, दा आणि मी डांभूर्णीला आलो. महाजन, सुरेश चौधरी सरपंच वगैरे मंडळी मागून येणार होती. दुपारी विठ्ठल वाघांचा कार्यक्रम चांगलाच रंगला त्यांनी 'तिफन' वगैरे कविता गाऊन दारवविल्या वाड्यातली बरीचशी बायामाणंस कार्यक्रमाला आपोआपच जमली. 'तिफन' वाघांनी प्रथम डांभुर्णीलाच ऐकवली असावी."[२६] जेव्हा विठ्ठल वाघ आले त्यावेळी मळ्यावरती जेवणाची सोय केली होती. त्यावेळी 'दा'चे दारु पिण्याचे प्रमाण वाढते. तो आणखी दारु पिण्यासाठी हट्ट करतो. पण त्यांना दिली जात नाही. कारण केलेले जेवण शिल्लक राहण्याची शक्यता होती. म्हणजेच गणेश चौधरी यांचे मानसिक संतुलन ढळू नये म्हणून त्यांची काळजी घेतली जात होती. नंतर मात्र विठ्ठल वाघांनी मैफिलीत आपल्या कविताने रंग भरला होता. अशा प्रकारे त्यांच्या जीवनाचा चित्रपट अखंड चाललेला होता.

गणेश चौधरी यांना जी. डी. बेंडाळेंच्या दवाखाण्यात दाखल केले. नंतर जळगाव व डांभूर्णी असा प्रवास चालू झाला. त्यावेळी डॉक्टरच्या विषयी दिवाकर चौधरी म्हणतात की, ''पंधरा दिवस झाले, पण दाच्या प्रकृतीत फरक पडेना उलट.... पण काय करणार? डॉक्टर बेंडाळे म्हणजे वैद्यकशास्त्रातले भीष्माचार्य. पेशंटचा व घरच्यांचा एकदम विश्वास म्हणजे कसा? कशीबी चिरफाड केली तरी आपला पेशंट काही मरत नाही असा.''[२७] म्हणजेच दिवाकर चौधरी यांचे डॉ. बेंडाळे हे फॅमिली डॉक्टर होते त्यांचा असणारा विश्वास ते तेथे सांगतात आहेत. येथे जेलमधून आल्यावर त्यांना ट्रिटमेंट चालू होती. त्यांनी कधी-कधी भास होत आणि त्यांना आणखी शॉक दिले जात होते. त्यांना ही ट्रिटमेंट मरेपर्यंत चालूच ठेवण्यात आली होती.

## आत्महत्येचा प्रयत्न :-

मनोरुग्णालयातून बाहेर आले तरी त्यांच्यावर ट्रिटमेंट चालूच होती. त्यांना अधून-मधून शॉक दिले जात होते. त्याचबरोबर इसीटी इन्शूलिन सायकोथेरपी अशा मानसोपचारांची ट्रिटमेंट ही दिली जात होते. त्यांनी आपल्या 'नागवा' या आत्मकथनामध्ये आपली मानसिक स्थिती सांगताना ते म्हणतात की, ''एखाद्या शब्दाचं, वाक्यांच, घटनेच, प्रसंगाचं डिसेक्शन करायची अन् वाजपेक्षा फाजील चिरफाड करायची मला सवयच आहे. माणसं सहज बोलतात, सहज विचारतात मी सहज बोलतो, सहज विचारतो. पण जे सहज विसरायचं ते सोडून!''[२८] येथे गणेश चौधरी ते जरी बरे झाले असते तरी त्याचे विचार अजून थांबले नव्हते. त्या विचारांची तंद्री त्यांना येत असल्याचे दिसते.

त्याच्या हातून झालेल्या कृत्यांची जाणीव त्यांना होत असे आणि त्यातून त्यांची मानसिकता ढळत होती. असेच एकदा दोन महिन्यापूर्वी त्यांची मानसिक स्थिती ठिक नव्हती. दिवाकर चौधरी यांना वाटे 'दा'च्या आगोदर आपण मरावे. त्यांच्या मनात शंकेने घर केले होते. एकदा असेच मामी ही शेतात काम करणारी बाई सांगत आली गणेश 'दा' अजून ही उठलेले नाही. तसे तो उशिरा उठत पण दहा पर्यंत झोपत असत त्यामुळे अंगात थरकाप उडाला आणि दिवाकर चौधरी मळ्यात गेले. तेथे बसून त्यांनी थोडेसे खाकरले.

त्यांनी डोळे उघडून पाहिले पण लगेच ते सांगतात की, "दिवाकर काल मी आत्महत्येचा प्रयत्न केला होता रे! खूप गोळ्या घेतल्या होत्या. आता उठलो"

मला एकदम रडायल आलं, माझा अंदाज बरोबर निघाला.

"दा असं काय करता तुम्ही?" हुंदक्यावर हुंदके, "लोक काय म्हणतील दा आम्हाले?" वास्तविक मी हे लोकांसाठी करतोय का? नाही पण असं सांगितल्याशिवाय दा शुध्दीवर येणार नाही"[२९] म्हणजे दिवाकर चौधरी आता चेहऱ्याच्या हावभावावरुन त्यांचे मन जाणून घेत होते. शिवाय डॉक्टरांनी दिवाकर चौधरींना सांगितले होते की, वेडी माणसे एक तर आत्महत्या करतात नाहीतर खून करण्याची शक्यता असते. त्यामुळे दिवाकर चौधरी सदैव सतर्क राहत असत. आणि त्यांना जपत असत. येथे दिवाकर चौधरी यांचे गणेश चौधरींवर असलेले निस्सिम प्रेम दिसून येते. या प्रेमात, काळजी, आपूलकी होते हे जाणवते. म्हणजेच मानसिक रुग्ण व्यक्ती ही त्याच्या वेडाच्या भरात स्वत:ला आणि दुसऱ्याला हानी पोचवू शकतात हे दिसते. पण येथे गणेश चौधरींना आपल्या प्रिय व्यक्तींच्या आठवणी व्याकुळ करतात. आणि त्या अवस्थेत त्यांना जगणेच अशक्य होते. हे नियतिने दिलेले क्रुर जीवन संपवण्याचा निष्फळ प्रयत्न होता.

## मृत्युशय्येवर असताना झालेला दत्तक विधी :

गणेश चौधरी यांची तब्बेत आता ठिक नव्हती. डॉ. बेंडाळेंनी त्यांना घरी सोडले होते. त्यांचा आजार वाढत होता पण डॉ. रमेश यांची ट्रिटमेंट चालू होती पण ते डॉ. बेंडाळेंप्रमाणे ट्रिटमेंट देत होते पण तरीही त्याचे हात पाय बारीक झाले होते. उपडा पडल्या पडल्या पाय त्याला आवरत नव्हते, तसेच चेहऱ्यावरच्या माश्याही हाकलता येत नाहीत, चेहरा पिवळा पडलेला होता. या वेळी अशोक, पनू, पका, यातू, पमू, हे सगळे त्यांची सेवा अतिशय आत्मीयतेने करत होते. दिवाकर चौधरी यांनी शीतलला गणेश चौधरींना दत्तक देण्याचा विचार केला. त्यांना दादाला दिलेल्या शब्दांची आठवण झाली, ते म्हणतात की, "एकदम झपाटल्यागत झालो. हाओ शीतलले दत्तक दी टाक्याचा रिक्षातून अशोक कोल्हेकडे ज़ाताना दाला सांगितलं होतं पाहिजे तं माहे तिन्ही मुलं तुह्या नावचे करी देतो. थेडा वेळ का होईना त्याला आनंद झाला होता. चेहरा एकदम नॉर्मल वाटायला लागला

होता.''[३०] दिवाकर चौधरीना आपल्या बोलण्याची आठवण झाली आणि त्यांनी आपले विचार गणेश चौधरीना सांगितले. असा मृत्युशय्येवर असताना ही त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

दत्तक विधिसाठी असिस्टंट रजिस्टार श्री. बोरोलेंना भेटलो आणि दत्तक विधिसाठी तारीख फायनल केली व या कार्यक्रमासाठी घरी येण्यासाठी विनंती केली वडिलांच्या ओळखीमुळे ते येण्यास तयार झाले आणि दत्तक विधीची तारीख ११ मार्च ठरवली गेली. पण मनामध्ये सारखी रुखरुख होती. कारण गणेश चौधरींना वांती व्हायच्या. किमान कार्यक्रम पार पडेपर्यंत तर असे काही होऊ नये त्यांना वाटत होते. सर्व कार्यक्रम दादाच्या खोलीतच घेण्यात आला होता. त्यासाठी सर्वजन राबत होते आणि आकरा वाजता बाळूकाकांनी मंत्रांना सुरुवात केली. होमाभोवती कल्पना, शीतल, दा अन् मी बसलो. दाला यातून लिलाधर, प्रल्हाद भाऊ यांनी आधार दिलेला होता. सर्वजन दा कडे पाहत होते. पण समारंभ आटोपता आटोपता त्यांना वांती होण्यास सुरुवात झाली. नंतर त्यांना पलंगावर टाकलं आणि मंत्रपठण सुरु झाले. पण वातावरणामध्ये अधिकच गंभीरता होते. त्या परिस्थितीमध्ये साथ दिली ती बोरालेसाहेब यांनी वेळेवर येऊन कागदपत्रांवर सह्या घेतल्या. गणेश चौधरींना सही करता येईल का नाही ही चिंता होती पण ती ही दूर झाली. गणेश चौधरीनी हात थरथरत सह्या केल्या आणि कार्यक्रम पार पडला.

पण दिवाकर चौधरी सांगतात की, ''समारंभानंतर दोन चार दिवस भारावलेल्या अवस्थेत गावात भटकत राहिलो. काही काही समाधान व्यक्त करायचे. ''चांगल झालं सर गणेशदादाच्या आत्म्याले गैन्ह समाधान झालं अशीन.'' खुप आनंद व्हायचा तर काही काही ''चांगल झालं, ज्याचं त्याचं ज्याले त्यालेच मायीन'' नही रे, अरे म्हणा रे, म्हणा रे हा गणेश सरांचा पोरगा आहे.''[३१]

यावरुन दिवाकर चौधरी हे आपल्या भावाला समाधान मिळावे. त्यांच्या जीवनात आनंदाचे थोडेतरी क्षण यावे. त्याला आनंद व्हावा म्हणून त्यांनी केलेला हा खटाटोप होता. या विधीनंतर शीतलला पाहून त्याच्या कोमजलेल्या चेहऱ्यावर आनंद दिसे आणि हे माझे बाबा म्हणून विचारल्यावर त्यांना आत्मिक समाधान मिळत होते.

गणेश चौधरींना त्यांच्या भावाच्या प्रेमामुळे त्यांच्या आपुलकीमुळे आणि त्यांच्या दिलेली वागणूक यामुळे गणेश चौधरीसारखा मनोरुग्ण व त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य टिकून राहिले आणि हा दत्तकविधी तर त्यांच्या जीवनातील अत्यंत आनंदाची सुखद अशी घटणा होती. यावरुन एका मनोरुग्णासाठी त्याच्या घरातील व्यक्तिंच्या भाव-भावना व्यक्त होतात.

## विकल अवस्थेत झालेला मृत्यु :-

दत्तकविधी नंतर त्यांची प्रकृती ढासळत गेली व त्यांना जळगावला डॉ. भंगाळे यांच्यात ट्रिटमेंट चालू केली होती. त्यांची ब्लडयुरिया सारखी कमी जास्त होत होती. त्यांना रक्त चडवण्यात आले त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर तेज दिसू लागले. त्यांना आणखी काही रक्ताच्या बाटल्या चढवण्यात आल्या. त्यावेळी दवाखाण्यातील घटना दिवाकर चौधरी सांगतात की, "दुसऱ्या दिवशी नीळकंठ महाजनांनी चाटच केले. "प्रिय गणेशदा" - "लोकमत"मध्ये लेख छापून आला होता. आधाशासारखा वाचला. 'लोकमत' घेऊनच ते पाटील-नेमाडेंच्या दवाखान्यात आले होते. ते आगोदर इकडे यायचे अन् मग आम्ही दोघ तिकडे जायचो. घाईतच सुभाष चौधरींच्या दवाखान्यात गेलो. लेख दाला दाखवला पाहिजे. म्हणजे वाचणार बिचनार नाही पण निदान त्याला फोटोतं पाहातीन?"[३२] गणेश चौधरींच्या विषयी सर्वांच्या मनात आदराची भावना होती. डॉक्टरांनी गणेश चौधरीना घरी नेण्यास सांगितले. सर्वांचे म्हणणे होते तिथेच दवाखाण्यात ठेऊन त्यांना ट्रिटमेंट देण्याची पण काही उपयोग नाही म्हणून त्यांना घरी आणले. त्यांना झोपून झोपून त्यांच्या शरीराला चट्टे पडले होते. त्याही अवस्थेत त्यांना सलाईन चालू होते. दिवाकर चौधरी आपल्या भावाच्या प्रेमाने वेडे होऊन प्रयत्न करत होते. पण तो काळा दिवस उगवला. २१ एप्रिल १९८२ रोजी गणेश चौधरी मरण पावले. त्यांच्या अखेरच्याच काय सुरवातीच्याही काळापासून त्यांना सर्वार्थाने समजावून घेणारे त्यांचे बंधू श्री. दिवाकर चौधरी यांनी 'गणेश चौधरीं'ना सर्वपरी समजावून घेतले.

दिवाकर चौधरी यांनी त्यांच्या मृत्यूवेळी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणतात की, "मा जागा सोडा आपला दा गेला! होओ रे बाप्पा तुले माध्याची मांडी पाहिजे होती. दा,

मला सहन होत नाही; मला सहन होत नाही। माझी शप्पथ. आम्ही तुझ्यावर प्रेम करायचो रे दा. मला तुझी असंख्य रुपं दिसतात फक्त एक रुप दिसत नाही - आणि नेमकं जगाला तुझं तेच रुप दिसत असेल का? ओरडून सांगावस वाटतं जगाला, माझा दा तसा नव्हता.... नाही!''[३३]

गणेश चौधरीच्या प्रेत यात्रेला अनेक जण सामील झाले होते. त्यामध्ये नीळकंठ महाजन व सुरेश चौधरी हे ही आले होते. त्यांनी त्यावेळी कविता वाचन केले. त्यावेळी त्यांचे अंत:करण भरुन आले त्यावेळी प्रादेशिक बातम्यांत ही बातमी आली होती. त्याचप्रमाणे 'जनशक्ती' स. सो. सुतारांचा लेख ही वाचून समाधान झाले. त्याचप्रमाणे 'लोकमत' मध्ये 'सुप्रसिद्ध कवी गणेश चौधरींचे देहावसान' अशा प्रकारे श्रद्धांजली दिली होती. त्याचप्रमाणे अनेक लोक सांत्वन करण्यासाठी येत होते. आता वादळही संपले होती. पण आता प्रचंड पोकळी निर्माण झाली होती.

गणेश चौधरी यांच्या अल्पचरित्राचा अभ्यास करत असताना. त्याच्या बालपणापासून त्यांच्या व्यक्तिगत जीवन अत्यंत वादळी होते. अनेक मानसिक संघर्षाच्या ठिणग्यांनी हा मानूस होरपळून काळा पडला आहे. आणि हे त्यांचे मानसिक संघर्ष त्यांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केले आहेत. म्हणजेच गणेश चौधरी या एका वादळाची परिणती मृत्युने थांबविण्यात कधीच होत नसते आणि गणेश चौधरी नावाची व्यक्ती कधीच मरण पावत नसते!

## * संदर्भ सूची *


१) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ ७

२) तत्रैव - पृष्ठ २७

३) काचेचं मन - गणेश चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, पहिली आवृत्ती, जून १९९०, पृष्ठ ११

४) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ २८

५) तत्रैव - पृष्ठ १२

६) स्क्रिझोफ्रेनिया - दिवाकर चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, प्रथम आवृत्ती१९८७, पृष्ठ५, प्रस्तावाना

७) काचेचं मन - गणेश चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, पहिली आवृत्ती, जून १९९०, पृष्ठ ११

८) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ ६६

९) तृषार्त - गणेश चौधरी, श्री वासुदेव शिवाजी महाजन, जळगांव, पहिली आवृत्ती, पृष्ठ १६ (मनोगत)

१०) काचेचं मन - गणेश चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, पहिली आवृत्ती, जून १९९०, पृष्ठ १०

११) तत्रैव - पृष्ठ १५ (गणेश चौधरी आणि शापित मन)

१२) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ ३०

१३) स्क्रिझोफ्रेनिया - दिवाकर चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, प्रथम आवृत्ती१९८७, पृष्ठ २ ते ३,(प्रस्तावाना)

१४) तत्रैव - पृष्ठ ५

१५) तत्रैव - पृष्ठ १८ ते १९

१६) तृषार्त - गणेश चौधरी, श्री वासुदेव शिवाजी महाजन, जळगांव, पहिली आवृत्ती, पृष्ठ ११ (लागेबांधे)

१७) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ ३ व ४

१८) तृषार्त - गणेश चौधरी, श्री वासुदेव शिवाजी महाजन, जळगांव, पहिली आवृत्ती, पृष्ठ १३ (लागेबांधे)

१९) स्क्रिझोफ्रेनिया - दिवाकर चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, प्रथम आवृत्ती१९८७, पृष्ठ १५ ते १६,

२०) तृषार्त - गणेश चौधरी, श्री वासुदेव शिवाजी महाजन, जळगांव, पहिली आवृत्ती, पृष्ठ ७ (लागेबांधे)

२१) 'सुर्य मध्यरात्रीचा आणि दोन एकांकिका - गणेश चौधरी, मित्र प्रकाशन, आवृत्ती पहिली १९८७

२२) स्क्रिझोफ्रेनिया - दिवाकर चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, प्रथम आवृत्ती१९८७, पृष्ठ ८, प्रस्तावना

२३) तृषार्त - गणेश चौधरी, श्री वासुदेव शिवाजी महाजन, जळगांव, पहिली आवृत्ती, पृष्ठ १ (लागेबांधे)

२४) स्क्रिझोफ्रेनिया - दिवाकर चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, प्रथम आवृत्ती१९८७, पृष्ठ १२९

२५) तत्रैव - पृष्ठ २०२

२६) तत्रैव - पृष्ठ २०५

२७) तत्रैव - पृष्ठ २३६

२८) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ ६

२९) स्क्रिझोफ्रेनिया - दिवाकर चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, प्रथम आवृत्ती,१९८७, पृष्ठ १२९

३०) तत्रैव - पृष्ठ २४१

३१) तत्रैव - पृष्ठ २४४

३२) तत्रैव - पृष्ठ २४८

३३) तत्रैव - पृष्ठ २५९